# ईयत्ता  अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन

संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभागाची  ईयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन झाली आहे.यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून ही प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती उपप्राचार्य प्रा. आनंद हुली  यांनी दिली.  www.sangameshwarcollege.in  या संकेतस्थळावर दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी कला वाणिज्य व विज्ञान शाखेत प्रवेश घेण्यासाठी कॉलेज संकेतस्थळावरून  अर्ज भरावा.

दहावीचा निकाल लागल्यानंतर जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार व वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईल. महत्त्वाचे म्हणजे ऑनलाइन प्रवेश अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या संकेतस्थळावरील माहिती काळजीपूर्वक वाचावी. कन्नड भाषिक विद्यार्थ्यांसाठी 50 टक्के जागा राखीव आहेत. त्यामुळे प्रवेश अर्जात कन्नड मायनॉरिटी हा पर्याय निवडणे अनिवार्य आहे .

सोबत सोबत कन्नड भाषिक प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे. दहावी सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी गुणांची नोंद करताना दिलेल्या सूचनांचे पालन करून अर्ज भरावा.

ऑनलाइन प्रवेश अर्जासाठी नोंदणी शुल्क रुपये पन्नास असून ते  डेबिट कार्डद्वारे ऑनलाइन भरता येईल. पूर्ण भरलेला अर्ज प्रवेश समितीकडे जमा करताना दहावी गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, जात प्रमाणपत्र, आधार कार्ड यांच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात. प्रवेश अर्जाची एक प्रत स्वतःजवळ ठेवावी. विनाअनुदान विभागाच्या प्रवेशासाठी तसेच प्रवेश प्रक्रियेच्या अधिक माहितीसाठी पर्यवेक्षक प्रा. प्रसाद कुंटे 9422334499  भाषा समन्वयक प्रा. शिवराज पाटील  9423326103   यांच्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.